**परदेश प्रवास करण्याऱ्यांसाठी परकीय चलनी नोटा व नाणी**
**नोव्हेंबर १३, २००१**

आता अधिकृत विक्रेते व पूर्ण चलन बदलून देणारे दलाल, यांना रिझर्व्ह बँकेच्या पूर्व परवानगी शिवाय परदेश प्रवास करणाऱ्यांना २००० अमेरिकन डॉलर पर्यंत परकीय चलन नोटा व नाण्यांच्या स्वरुपात पुरविण्याची परवानगी देण्यात येत आहे. या बाबतीतील कार्यपद्धती सोप्या करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने यानुसार नियमांमध्ये सुधारणा केल्या आहेत. सध्या परदेश-प्रवास करणाऱ्यांसाठी, नोटा व नाण्यांच्या स्वरुपात परकीय चलन देण्याची कमाल मर्यादा ५०० अमेरिकन डॉलर एवढी आहे.

**अल्पना किल्लावाला**
**महा व्यवस्थापक**

**प्रेस रिलीज २००१-२००२ / ५७७**